पनवेल (प्रतिनिधी) नागरिकांच्या समस्या काय आहेत व त्या सोडविण्यासाठी काय करायला हवे, याची जाणिव ठेवून कॉंग्रेस पक्ष सक्रीयतेने काम करीत आहे, असे प्रतिपादन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी रविवारी खारघर येथे केले.

खारघर शहरातील सेक्टर २, ८ व १० मधील प्रभाग एकमध्ये लिटील मॉलशेजारी सुरू करण्यात आलेल्या आमदार प्रशांत ठाकूर जनसंपर्क कार्यालय व विभागीय कॉंग्रेस कमिटी कार्यालयाचे उदघाटन तसेच विद्यार्थ्यांना मोफत वहयांचे वाटप लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. त्यापसंगी ते बोलत होते. कार्यकर्त्यांना ताकद देण्याचे काम कॉंग्रेस पक्षाच्या माध्यमातून होत असून जनतेचे प्रश्न व समस्या आपल्या आहेत असे समजून त्या सोडविण्यासाठी या जनसंपर्क कार्यालयातून कामे होतील, असा विश्वासही लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी यावेळी व्यक्त केला.

यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी आपल्या भाषणातून सांगितले की, महामार्गालगत असलेल्या नाला बंदिस्तीसाठी पाठपुरावा करीत असून त्यासाठी सिडकोकडे आग्रह धरला होता. त्याचा आराखडा तयार असून लवकरच हा नाला बंदिस्त केला जाईल अशीही माहिती दिली. याप्रसंगी झनक सिंग, किर्ती नवघरे यांचीही भाषणे झाली.

कार्यक्रमास ज्येष्ठ नेते तथा खारघर शहर प्रभारी वाय. टी. देशमुख, पनवेल विधानसभा युवक कॉंग्रेसचे अध्यक्ष दशरथ म्हात्रे, खारघर कॉंग्रेसचे अध्यक्ष अनंता तोडेकर, नाना घरत, सुरेश ठाकूर, महिला अध्यक्षा कुंदा मेंगडे, तालुका चिटणीस रामदास नारकर, ॲड. जे. पी. खारगे, तळोजा इंडस्ट्रिज असोसिएशने अध्यक्ष सतिष शेट्टी, शत्रुघ्न काकडे, रमेश तपासे, किशोर काकडे, अक्षय लोखंडे, उमेश चव्हाण, प्रशांत रणदिवे, सुरेखा कदम, राज विश्वकर्मा, किशोर ठाकूर, नितीन कदम, निलेश तोडेकर, सतिश शेळके, बाळकृष्ण पाटील, मधू काकडे, विनोद ठाकूर, आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.